मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

दैनिक मराठी

# मिडिया मंत्र

PRGI NO: MHMAR/26/A6784

मुख्य संपादक: श्री किसन सोपान टाव्हरे

दिनांक :३०/०८/२०२६ वार : रविवार अंक १४ वर्ष ०१

## संदीप पोपट भोर यांची 'मीडिया मंत्र'च्या आंबेगाव ग्रामीण प्रतिनिधीपदी नियुक्ती



मंचर (प्रतिनिधी) - संदीप पोपट भोर यांची 'मीडिया मंत्र'च्या आंबेगाव ग्रामीण प्रतिनिधीपदी नियुक्ती आंबेगाव : 'मीडिया मंत्र' दैनिकाच्या आंबेगाव ग्रामीण प्रतिनिधीपदी श्री. संदीप पोपट भोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक, कृषी, आरोग्य व जनहिताच्या प्रश्नांना माध्यमातून वाचा फोडण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल मीडिया मंत्रचे संपादक किसन सोपान टाव्हरे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आंबेगाव | मीडिया मंत्र प्रतिनिधी 'मीडिया मंत्र' दैनिकाच्या आंबेगाव ग्रामीण प्रतिनिधीपदी श्री. संदीप पोपट भोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मीडिया मंत्रच्या व्यवस्थापनाकडून त्यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली. आंबेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, सांस्कृतिक, राजकीय तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी श्री. भोर हे मीडिया मंत्रच्या माध्यमातून कार्य करणार आहेत. ग्रामीण भागातील घडामोडी, विकासकामे आणि जनहिताचे प्रश्न वस्तुनिष्ठ पद्धतीने समाजासमोर आणण्यावर त्यांचा भर राहणार आहे. श्री. संदीप पोपट भोर यांचा ग्रामीण भागातील नागरिकांशी असलेला संपर्क आणि सामाजिक क्षेत्रातील सहभाग लक्षात घेऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून अभिनंदन करण्यात येत असून पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत. मीडिया मंत्रचे संपादक किसन सोपान टाव्हरे यांनीही श्री. संदीप पोपट भोर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो कधी सुरू होणार?

पुणे शहरातील प्रवाशांसह हिंजवडी (Hinjewadi) आयटी परिसरात काम करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर (Shivajinagar) या बहुप्रतीक्षित मेट्रो मार्गाच्या उद्घाटनाची तारीख निश्चित झाली आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी (Narendra Modi) ऑनलाइन पद्धतीने या सेवेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. त्यामुळे या मार्गावरील प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. माण-बालेवाडी पहिल्या टप्प्यात मेट्रो धावणार : हिंजवडी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मेट्रो प्रकल्पाचे काम दोन टप्प्यांत पूर्ण करून सेवा सुरू केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात माण स्थानकापासून आर. के. लक्ष्मण संग्रहालय, बालेवाडी येथील स्थानकापर्यंत मेट्रो धावेल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात बाणेर हायस्ट्रीट ते शिवाजीनगर हा मार्ग प्रवाशांसाठी खुला केला जाणार आहे. त्यामुळे हिंजवडी परिसरातून शहराच्या मध्यभागाकडे जाणाऱ्या प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध होईल. माण ते बालेवाडी या पहिल्या टप्प्यात एकूण 12 स्थानके आहेत. या मार्गावर प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त (CMRS) यांनी 23 जुलै रोजी आवश्यक मंजुरी दिली होती. तांत्रिक तपासणी, विविध चाचण्या आणि सुरक्षा निकषांची पूर्तता झाल्यानंतर ही परवानगी देण्यात आली. त्यामुळे संबंधित मार्गावर मेट्रो ताशी 80 किलोमीटरपर्यंतच्या कमाल वेगाने धावण्यास तयार आहे. सुरक्षा मंजुरी मिळाल्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (PMRDA) राज्य सरकारशी पत्रव्यवहार करून सेवा सुरू करण्यासाठी उद्घाटनाची तारीख निश्चित करण्याची विनंती केली होती.पुण्यात आतापर्यंत सुरू करण्यात आलेल्या मेट्रोच्या विविध टप्प्यांच्या उद्घाटनाची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडेच राहिली आहे. यापूर्वीच्या टप्प्यांनाही त्यांनी हिरवा झेंडा दाखवला होता. त्यामुळे हिंजवडी-शिवाजीनगर हा महत्त्वाचा मार्ग सुरू करतानाही पंतप्रधानांच्या हस्तेच उद्घाटन व्हावे, अशी भूमिका मुख्यमंत्री कार्यालयाने घेतली होती. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान कार्यालयाशी संपर्क साधून उद्घाटनासाठी त्यांच्या वेळेची मागणी करण्यात आली होती. पंतप्रधानांच्या व्यस्त कार्यक्रमामुळे या सेवेला प्रत्यक्ष सुरू होण्यासाठी काही दिवसांचा विलंब झाला, अशी माहिती देण्यात आली. मात्र आता राज्य सरकारने सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातील एक दिवस उद्घाटनासाठी निश्चित केला आहे. पंतप्रधान मोदी ऑनलाइन माध्यमातून या मेट्रो सेवेचे लोकार्पण करणार आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनीही नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी हा मार्ग शक्य तितक्या लवकर कार्यान्वित करणे हे प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. मेट्रो सुरू झाल्यानंतर हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. विशेषतः आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना रोजच्या प्रवासासाठी या सेवेचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

## मुंबईत दूध महागले; 1 सप्टेंबरपासून नवा दर लागू

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील नागरिकांच्या घरगुती खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. 1 सप्टेंबर 2026 पासून तबेल्यातून विकल्या जाणाऱ्या दुधाच्या घाऊक दरात प्रतिलिटर 9 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे 93 रुपये प्रतिलिटर असलेला दर आता 102 रुपयांवर पोहोचणार आहे. हा वाढीव दर 28 फेब्रुवारी 2027 पर्यंत कायम राहणार आहे. मुंबईत तबेल्यातील दूध 102 रुपयांना : मुंबईतील दूध उत्पादकांनी दुधाच्या दरात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत 93 रुपये प्रतिलिटर दराने उपलब्ध असलेले तबेल्यातील दूध आता ग्राहकांना 102 रुपये प्रतिलिटर दराने घ्यावे लागणार आहे. म्हणजेच एका लिटरमागे थेट 9 रुपये अतिरिक्त खर्च करावा लागेल. रोजच्या वापरातील दूध महागल्याने कुटुंबांच्या मासिक बजेटवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.




